# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. ३१/०५/२०११
## (दि. २७/०५/२०१११ रोजीची तहकुब सभा)

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक ३१/०५/२०११ (दि. २७/०५/२०११ ची तहकुब सभा) रोजी सभा सुचना क्र. ०५ दि. २३/०५/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉ. मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २. | श्री. दिनेश दगडु नलावडे | सदस्य |
| ३. | श्री. चंद्रकांत भि. मोदी | सदस्य |
| ४. | श्री. चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | सदस्य |
| ५. | श्रीम. सुधा वासुदेव व्यास | सदस्या |
| ६. | श्रीम. निर्मला बा. सावळे | सदस्या |
| ७. | श्रीम. कॅटलीन परेरा | सदस्या |
| ८. | श्री. राजेश म्हात्रे | सदस्य |
| ९. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| १०. | श्री. लक्ष्मण जंगम | सदस्य |
| ११. | श्री. भगवती तु. शर्मा | सदस्य |
| १२. | श्रीम. मुसर्रतबानो शेख | सदस्या |
| १३. | श्रीम. स्नेहा शैलेश पांडे | सदस्या |
| १४. | श्री. रामनारायण दुबे | सदस्य |
| १५. | श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शशिकांत भोईर | सदस्य |

**मा. सभापती :-**

सचिव साहेब, सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**भगवती शर्मा :-**

मा. सभापती साहब की, परवानगी से बोलता हूँ की, आज स्थायी समिती की तहकुब मिटींग रखी है तो इस मिटींग मे आयुक्त साहब नही है, उपायुक्त साहब भी नही है तो फिर इस सभा को शाम को ५ बजे लि जाए।

**नगरसचिव :-**

मुळ अजेंडावर २८ ते ३१ चार प्रकरण आहे आणि हि चार प्रकरणाचे गोषवारे ऑलरेडी दिलेले आहे. आणि दुसरे चार प्रकरण २ के खाली सुचवलेले आहे त्याची सर्वानुमते सभागृहात मान्यता घेण्यात आली. त्याचे विषयपत्रिकेसह प्रशासनाने गोषवारासहीत द्यावे.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. सभा संपली असे मी जाहीर करतो.

**दिनेश नलावडे :-**

साहेब, आपण यांच्यावर थोडीशी कारवाई तर करा.

**मा. सभापती :-**

कारवाई करु ना. आपल्याला कारवाई करायलाच लागेल.

**भगवती शर्मा :-**

संध्याकाळी ज्या विभागाचे अधिकारी नाही त्याच्यावर सस्पेंड कारवाई आपण करु. त्यावेळी मी ठराव मांडणार.

**लक्ष्मण जंगम :-**

मला असे वाटत की, ठराव करायचा आहे तर आताच करुन घ्या.

**मा. सभापती :-**

कोणासमोर करणार? त्यासाठी आयुक्त पाहिजेत.

**भगवती शर्मा :-**

तरीपण माझी सुचना आहे. संबंधीत विभागाचे अधिकारी नाहीत त्याच्यावर कारवाई करा.

**चंद्रकांत मोदी :-**

ऐसे भी आयुक्त साहब जाते है तो कोई भी बैठता है ना।

**मा. सभापती :-**

कौन बैठेगा?

**चंद्रकांत मोदी :-**

बारकुंड साहब बहोत बार बैठे है ना।

**निर्मला सावळे :-**

सचिव साहब मा. आयुक्त पूर्ण शहराच्या विभागाचे प्रमुख आहेत तर त्यांच्यानंतर खुर्चीवर बसण्याचा अधिकार कोणाचा आहे तुमच्या नियमानूसार?

**नगरसचिव :-**

त्यांना आयुक्तांनी नेमणूक करायची असते. कोणाला बसवायचे हे सचिव सांगणार नाही आयुक्त साहेब सांगणार की, माझ्या ॲबसेन्समध्ये हे बसतील ते बसतील त्यांनीच सांगायचे.

**चंद्रकांत मोदी :-**

सचिव साहब, कायदे मे क्या है?

**नगरसचिव :-**

आयुक्त साहेब, डायरेक्शन देणार त्याच्यावतीने कोणीही बसावे.

**मा. सभापती :-**

५ वाजेपर्यंत सभा तहकुब करण्यात येत आहे.

**भगवती शर्मा :-**

मैने बोला कमिश्नर साहब नही है। इतना गंभीर विषय है तहकुब मिटींग लगाई थी इसके लिए मै बोला की, संबंधीत विभाग के अधिकारी भी नही है। इसिलिए मैने बोला ५ बजे तक सभा तहकुब किजिए ऐसा मै ठराव किया है।

**लक्ष्मण जंगम :-**

सचिव साहेब, आयुक्त साहेब नसतील तर उपायुक्त सभा चालवतात ज्यावेळेला मा. महापौर सो. नसतात........

**नगरसचिव :-**

आयुक्त साहेब ज्यांना आदेश देतील ते आयुक्तांच्या वतीने त्यांच्या जागेवर बसु शकतात.

**लक्ष्मण जंगम :-**

उपायुक्त साहेब आलेले आहेत तर त्यांना विचारा की ते सभा चालवू शकतात का?

**मा. सभापती :-**

विचारा.

**लक्ष्मण जंगम :-**

उपायुक्त साहेब तुम्ही या सभेला उपस्थित आहेत तुम्ही सांगा तसे की, आयुक्तांनी तुम्हाला निर्देश दिलेले आहे की, तुम्ही सभा चालवू शकतात, नाही चालवू शकता तुम्ही समर्थ आहात की असमर्थ आहात? तसा तुम्ही उल्लेख करा.

**मा. सभापती :-**

तुम्ही समर्थ आहात की नाही ते कशाला विचारता? जो प्रश्न विचारायचा तो विचारा ना. तुम्हाला ऑर्डर दिलेली आहे की नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती साहेब, आपण असंच म्हणतो की, त्यांनी त्याच्याच खुलासा करायचा आहे ना. आपण कुठे त्यांना वाईट बोलतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. आयुक्त साहेब, खाजगी कामासाठी मुंबईला गेलेले आहेत. तुम्हाला त्यांच्याकडुन उत्तर पाहिजे तर सभा तहकुब करा. माझ्याकडुन हवे तर मी उत्तर देऊ शकतो. काही विषय असतील ते तुम्हाला त्यांच्याकडुन कबूल करुन घ्यायचे असेल किंवा त्यांच्याकडुन मंजूरी पाहिजे तर ५ वाजेपर्यंत आपण थांबा.

**चंद्रकांत मोदी :-**

पानपट्टे साहबने अनेक बार सभा चलाया है नही चलाया ऐसा कुछ नही है।

**मा. सभापती :-**

विषय है उस हिसाब से मै बोल रहा हूँ। कमिश्नर साहब अभी नही है उन्होंने मुझे कहाँ की मै ४ बजे तक आता हूँ। संबंधीत अधिकारी भी नही है।

**चंद्रकांत मोदी :-**

हमारी विनंती है। डेप्युटी कमिशनर हर टाईम मे इसे भी बडे बडे विषय पे सभा चलाया है।

**मा. सभापती :-**

५ वाजेपर्यंत सभा तहकुब करुया.

**चंद्रकांत मोदी :-**

उपायुक्त साहब तो है ना। सचिव साहब कायदा क्या है?

**मा. सभापती :-**

उपायुक्त साहब आने से पहले मैने मिटींग तहकुब किया है।

**(सभा तहकुब झाल्याची वेळ दु.१२.३० वा.)**

**(तहकुब सभेला सांय. ५.०० वाजता सुरुवात करण्यात आली)**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ३१/०५/२०११

## (दि. २७/०५/२०१११ रोजीची तहकुब सभा)

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक ३१/०५/२०११ (दि. २७/०५/२०११ ची तहकुब सभा) रोजी सभा सुचना क्र. ०५ दि. २३/०५/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सायं. ५.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉ. मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २. | श्री. दिनेश दगडु नलावडे | सदस्य |
| ३. | श्री. चंद्रकांत भि. मोदी | सदस्य |
| ४. | श्री. चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | सदस्य |
| ५. | श्रीम. सुधा वासुदेव व्यास | सदस्या |
| ६. | श्रीम. निर्मला बा. सावळे | सदस्या |
| ७. | श्रीम. कॅटलीन परेरा | सदस्या |
| ८. | श्री. राजेश म्हात्रे | सदस्य |
| ९. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| १०. | श्री. लक्ष्मण जंगम | सदस्य |
| ११. | श्री. भगवती तु. शर्मा | सदस्य |
| १२. | श्रीम. मुसर्रतबानो शेख | सदस्या |
| १३. | श्रीम. स्नेहा शैलेश पांडे | सदस्या |
| १४. | श्री. रामनारायण दुबे | सदस्य |
| १५. | श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शशिकांत भोईर | सदस्य |

**मा. सभापती :-**

सचिव साहेब, तहकुब झालेल्या सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. २७/०५/२०११ रोजी सायंकाळी ठिक ०४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरहू सभा तहकूब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबित विषय क्र. २८ ते ३१ व मुं. प्रां. म. अ. १९४९ चे अनुसुची २ नियम "के" अन्वये घेण्यात आलेले एकुण ४ विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा मंगळवार दिनांक ३१/०५/२०११ रोजी

सकाळी ११.०० वाजता स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात आयोजित केलेली आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सभा दि. २७/०५/२०११ ची तहकुब सभा व दि. ३१/०५/२०११ ची स्थायी समिती सभा, सभेमधील प्रशासनाने गोषवाऱ्यासह दिलेल्या प्रकरण क्रं. २८ ते ३१ वेळेअभावी रद्द करण्यात येत आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण क्रं.२/क प्रमाणे घेण्यात आलेले विषय क्रं.०१ ते ०४ त्या मधला विषय क्रं.०१ घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २००० अन्वये प्रभाग निहाय वॉर्ड साफसफाई करणे बाबत, मिरा भाईंदर महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत मागविलेल्या निविदा व त्यात उल्लेखलेल्या अटीमध्ये दोष असून व दि. १८/०१/२०११ ची तहकुब महासभा व दि. ०१/०२/२०११ मा. महासभा प्रकरण क्रं. ९५, ठराव क्रं. ८६ प्रमाणे नाहीत. तरी सदर मागविण्यांत आलेल्या निविदा रद्द करण्यांत याव्यात व महासभा दि. ०१/०२/२०११ ठराव क्रं. ८६ ला अधिन राहुन फेर निविदा मागविण्यात याव्यात असा मी ठराव आजच्या स्थायी समिती सभेमध्ये मांडत आहे. व मिरा भाईंदर महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २/क मध्ये घेण्यात आलेले विषय क्रं.२/३ आणि ४ यांना विषयपत्रिकेत गोषवारा सहित स्थायी समितीमध्ये घेण्यात यावेत असा मी ठराव मांडत आहे.

**मोहन म्हात्रे :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**भगवती शर्मा :-**

मा. सभापती महोदय आज दि. ३१/०५/२०११ रोजीची स्थायी समिती सभा ही सकाळी तहकुब केलेली होती आणि ही सभा सायंकाळी ५.०० वा. बोलवण्यात आली होती. या सभेमध्ये घनकचऱ्याचा विषय सोडून सविस्तर माहिती वाटाघाटी करुन परत दर कमी करणेबाबत विषय पूढे घेण्यात यावा. व बाकीचे विषय आजच्या स्थायी समितीमध्ये घेण्यात यावे असा मी ठराव मांडतो.

**राजेश म्हात्रे :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

सभा तहकुबीसाठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठरावाचे सुचक लक्ष्मण जंगम अनुमोदन मोहन म्हात्रे आहेत. दुसऱ्या ठरावाचे सुचक भगवती शर्मा अनुमोदन राजेश म्हात्रे आहे. मी दुसऱ्या ठराव वाचून मतदानास टाकतो. दोन ठराव आले की, मतदान घेणं आवश्यक आहे. आज दि. ३१/०५/२०११ रोजीची स्थायी समिती सभा ही सकाळी तहकुब केलेली होती आणि ही सभा सायंकाळी ५.०० वा. बोलवण्यात आली होती. या सभेमध्ये घनकचऱ्याचा विषय सोडून सविस्तर माहिती वाटाघाटी करुन परत दर कमी करणेबाबत विषय पूढे घेण्यात यावा. व बाकीचे विषय आजच्या स्थायी समितीमध्ये घेण्यात यावे असा मी ठराव मांडतो. या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**भगवती शर्मा :-**

त्याच्यामध्ये वाटाघाटीमध्ये दर कमी करणे.

**नगरसचिव :-**

या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हातवर करायचे आहे. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे. तटस्थ कोणी आहे का? मी पहिला ठराव वाचायला घेतो सुचक, श्री. लक्ष्मण जंगम अनुमोदन, श्री. मोहन म्हात्रे. मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सभा दि. २७/०५/२०११ ची तहकुब सभा व दि. ३१/०५/२०११ ची स्थायी समिती सभा, सभेमधील प्रशासनाने गोषवाऱ्यासह दिलेल्या प्रकरण क्रं. २८ ते ३१ वेळेअभावी रद्द करण्यात येत आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण क्रं.२/क प्रमाणे घेण्यात आलेले विषय क्रं.०१ ते ०४ त्या मधला विषय क्रं.०१ घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २००० अन्वये प्रभाग निहाय वॉर्ड साफसफाई करणे बाबत, मिरा भाईंदर महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत मागविलेल्या निविदा व त्यात उल्लेखलेल्या अटीमध्ये दोष असून व दि. १८/०१/२०११ ची तहकुब महासभा व दि. ०१/०२/२०११ मा. महासभा प्रकरण क्रं. ९५, ठराव क्रं. ८६ प्रमाणे नाहीत. तरी सदर मागविण्यांत आलेल्या निविदा रद्द करण्यांत याव्यात व महासभा दि. ०१/०२/२०११ ठराव क्रं. ८६ ला अधिन राहुन फेर निविदा मागविण्यात याव्यात असा मी ठराव आजच्या स्थायी समिती सभेमध्ये मांडत आहे. व मिरा भाईंदर महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २/क मध्ये घेण्यात आलेले विषय क्रं.२/३ आणि ४ यांना विषयपत्रिकेत गोषवारा सहित स्थायी समितीमध्ये घेण्यात यावेत असा मी ठराव मांडत आहे. या ठरावाच्या बाजुने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहत. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य श्री. लक्ष्मण जंगम यांचा ठराव ९ मताने मंजूर झाला आहे. तसेच आजची सभा संपली असे मी जाहीर करतो.

**ठराव क्र. २८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सभा दि. २७/०५/२०११ ची तहकुब सभा व दि. ३१/०५/२०११ ची स्थायी समिती सभा, सभेमधील प्रशासनाने गोषवारा‍ासह दिलेल्या प्रकरण क्रं. २८ ते ३१ वेळेअभावी रद्द करण्यात येत आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण क्रं.२/क प्रमाणे घेण्यात आलेले विषय क्रं.०१ ते ०४ त्या मधला विषय क्रं.०१ घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २००० अन्वये प्रभाग निहाय वॉर्ड साफसफाई करणे बाबत, मिरा भाईंदर महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत मागविलेल्या निविदा व त्यात उल्लेखलेल्या अटीमध्ये दोष असून व दि. १८/०१/२०११ ची तहकुब महासभा व दि. ०१/०२/२०११ मा. महासभा प्रकरण क्रं. ९५, ठराव क्रं. ८६ प्रमाणे नाहीत. तरी सदर मागविण्यांत आलेल्या निविदा रद्द करण्यांत याव्यात व महासभा दि. ०१/०२/२०११ ठराव क्रं. ८६ ला अधिन राहुन फेर निविदा मागविण्यात याव्यात असा मी ठराव आजच्या स्थायी समिती सभेमध्ये मांडत आहे. व मिरा भाईंदर महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २/क मध्ये घेण्यात आलेले विषय क्रं.२/३ आणि ४ यांना विषयपत्रिकेत गोषवारा सहित स्थायी समितीमध्ये घेण्यात यावेत असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. लक्ष्मण जंगम** **अनुमोदक :- श्री. मोहन गोपाळ म्हात्रे**

| ठरावाच्या बाजुने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|
| १) श्री. दिनेश दगडू नलावडे<br>२) श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी<br>३) श्री. चंद्रकांत खंडोजी म्हात्रे<br>४) सौ. निर्मला बाबुराव सावळे<br>५) श्री. लक्ष्मण जंगम<br>६) श्री. मुसर्तबानु शेख<br>७) श्री. दुबे रामनारायण सदानंद<br>८) श्रीम. स्नेहा शैलेश पांडे<br>९) श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | १) श्री. स्टिवन मेन्डोन्सा<br>२) सौ. सुधा वासुदेव व्यास<br>३) श्री. भगवती शर्मा<br>४) सौ. कॅटलीन परेरा<br>५) श्री. राजेश म्हात्रे<br>६) श्री. जाधव मोहन | निरंक |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**(सभा संपल्याची वेळ सायं.५.४५ वा.)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**